# स्थानिक गुन्हे शाखा, पालघर
## Local Crime Branch, Palghar
Phone No. 02525-297031, PI L.C.B. Mob No.8669604007
Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)
E-mail : lcb.plgr@mahapolice.gov.in


जावक क्रमांक :- स्थागुशा/बोईसर युनीट/ १६५ /२०२० दिनांक :- ०६/०४/२०२०

# प्रेसनोट

## बनावट हॅन्ड सॅनेटायझर बनवुन विक्री करणारे कंपनीवर स्थानिक गुन्हे शाखेच्या बोईसर युनीटकडून कारवाई

जागतिक स्तरावर कोरोना (कोवीड-१९) या संसर्गजन्य रोगाचे प्रसाराला आळा घालण्यासाठी शासनाने नागरीकांना हॅन्ड सॅनेटायझरचा वापर करण्याबाबत सुचना दिलेल्या असल्याने बाजारात हॅन्ड सॅनेटायझरचा मागणी मोठया प्रमाणात वाढली असल्याने वाडा तालुक्यातील हमरापुर येथील सारु केमिकल्स प्रा.लि.घर नंबर ३०६,प्लॉट नंबर १८ या कंपनीत विनापरवाना अनाधिकृतपणे हॅन्ड सॅनी क्लीन नावाचे हॅन्ड सॅनेटायझरचे उत्पादन सुरु असल्याची खात्रीशीर बातमी स्थानिक गुन्हे शाखेच्या बोईसर युनीटचे प्रभारी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक भीमसेन गायकवाड यांना प्राप्त झाली होती. त्यानुसार मा.गौरव सिंग,पोलीस अधीक्षक,पालघर यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक भीमसेन गायकवाड तसेच अन्न व औषध प्रशासन ठाणे यांचेकडील औषध निरीक्षक श्री मनिष चौधरी व श्री श्यामसुंदर प्रतापवार यांचे पथकाने हमरापुर येथील सारु केमिकल्स प्रा.लि.या कंपनीत संयुक्त कारवाई केली असता कंपनीचे संचालकांनी जार्डन सेन्टस पालघर यांचा उत्पादन परवाना क्रमांक केडी/सी-४२९ या नावाचा वापर करुन शासनाची व नागरीकांची दिशाभुल करुन फसवणुक करुन हॅन्ड सॅनी क्लीन नावाचे हॅन्ड सॅनेटायझर बनविण्यासाठी लागणारे कच्चा माल साधनसामुग्री व तयार हॅन्ड सॅनी क्लीन नावाचे हॅन्ड सॅनेटायझर असे एकुण १९,०६,३५०/- रुपयांचा मुददेमाल छापा कारवाई करुन जप्त केला आहे. याबाबत सारु केमिकल्स प्रा.लि.मॅनेंजीग डायरेक्टर सुलतान नुरुददीन लोखंडवाला व अन्य संचालक यांचेविरुध्द वाडा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्रमांक ९०/२०२० भादंविसक. ४२०,३४ सह औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० चे कलम 18 (C),18 (a)(ii), 17 (D)(d), सह वाचन कलम ३४,औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० चे कलम २७ A अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास वाडा पोलीस ठाणे यांचेकडून करण्यात येत आहे.

सदरची कारवाई मा.गौरव सिंग,पोलीस अधीक्षक,पालघर,मा.विक्रांत देशमुख, अपर पोलीस अधीक्षक,पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली मा.रविंद्र नाईक, पोलीस निरीक्षक,स्थानिक गुन्हे शाखा पालघर, बोईसर युनिट चे प्रभारी अधिकारी,भीमसेन गायकवाड, सहा.पोलीस निरीक्षक, अभिजीत टेलर,पोलीस उप निरीक्षक, सफौ.विनायक ताम्हाणे, सुनिल नलावडे, पो.हवा.मुद्दतसर दांडेकर, दिपक राऊत, संतोष निकोळे, संदिप सुर्यवंशी, पो.ना.निरज शुक्ला,नरेंद्र पाटील, नरेश जनाठे, पोशि.उदय चौधरी यांचे पथकाने केली आहे.

Scanned with CamScanner